
ISSN 2231-1629

# Knowledge Resonance

A Half Yearly National Peer Reviewed Research Journal



Vol 8 No.1 Jan-July 2019

## Research Journal Publication Committee

Dr. M. K. Umathe College, Nagpur

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

:ditor

Professor,
the College,
hamti, Ring Road,
440022

esh Peshve
ncipal,
M.P. Deo memorial
ollege, Nagpur.

ilip Jena
llege, Gondia,
. Gondia

je Augustin
bhalkar College of
ork, Nagpur.

hik Pinicker
nt Pro…or
llege, …ndara,
Bhandara

ijay Singh
incipal
arjurkar College,
ist. Chandrapur

Swain
d Dept. Of Sociology
pur University,
agpur

as Dhone
Professor,
ahvidyalaya,Wardha

Undirwade
l Dept. of Economecs,
University, Nagpur.

Shakeel Sattar
Professor,
llege …pur

om

ISSN 2231-1629

# Knowledge Resonance

(A half yearly National Peer Reviewed Research Journal )

Vol. 8 No. 1 Jan-July 2019

# CONTENTS

1. **सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांना निवृत्तीनंतर येणाऱ्या कौटुंबिक समायोजनच्या समस्या** ........ 02
लक्ष्मी सीताराम डाखोळे

2. **अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी** ........ 06
प्रा. डॉ. राजू भाऊरावजी खरडे

3. **मुद्रित माध्यमातील व्यावसायिक बदल** ........ 09
प्रा. मनिषा सुभाष मोहोड

4. **महानुभाव पंथात स्त्रियांचे स्थान** ........ 13
डॉ. प्रीती किशोर उमाठे

5. **जात आणि लिंग विषमता** ........ 16
डॉ. प्रशांत रामदासजी राऊत

6. **अर्थव्यवस्थेतील महिला उद्योजिकांची भूमिका** ........ 20
डॉ.भारती सुदर्शन गोस्वामी

7. **"ग्रामीण विकासात प्रसार माध्यमांची भूमिका"** ........ 24
प्रा. विनोद बी. खेडकर

8. **नागपूरातील म्हाडाच्या निम्न व मध्यम उत्पन्न गटातील गाळयांचे गृहआयोजन सिद्धांतानुसार तुलनात्मक अध्ययन** ........ 28
डॉ. सुजाता एस. साखरे

9. **भारतीय महिलाओं की आधुनिक समस्या और समाधान** ........ 34
प्रा. अशोक जानवे

10. **Economic position of women in the workplace** ........ 38
Dr. Mugdha Deshpande

11. **Library Knowledge Management** ........ 42
Dr Sunil Kundlik Jadhav,

12. **A Comparative Study Of Nutritional Status Of Children (Age 3 - 6) Under The ICDS And Non ICDS Schools In Nagpur City** ........ 44
Dr. Sadhana K. Karhade

ISSN 2231-1629
Knowledge Sonance

# महानुभाव पंथात स्त्रियांचे स्थान

डॉ. प्रीती किशोर उमाठे
मराठी विभाग प्रमुख, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर

तत्कालीक महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला असता असे दिसुन येते की, त्यावेळी हिंदू समाज हा वर्णाश्रम पद्धतीने जखडलेला होता. सर्व धर्म ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले गेले होते, स्त्री शुद्राद्रिकांना सन्यास घेण्याचा व मोक्षाचा मार्ग अवलंब विण्यासाठी अधिकार नव्हता, सर्वसामान्य हिंदू समाज तत्वज्ञानाअभावी बाह्य प्रचारांच्या सर्वत्र वावरत होता. तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहता अज्ञान, अंधःश्रद्धा पोकळ कर्मकांड यांना ऊत आला होता. समाज या कर्म कांडाच्या जंजाळात अडकला होता. त्या काळात अत्याचाराची, छळीची व शोषणाची मालिका पुनःप्रादुर्भूत झाली होती. स्त्री आणि शुद्र हे दोन्ही वर्ग बिन पगारी आणि इमान दाराचे दास बनले होते. शूद्रांपेक्षाही स्त्रियांचे शोषण तर महाभयंकर होते. घरात राहून आजन्म कैद भोगणारी नारी, सतीच्या रूपात चितेत जळणारी अबला, सर्व प्रकारचे सेवादास्य करूनही पतीचा मार खाणारी पतिव्रता, दिवसभर मर मर काम करून थकली तरी थकवा न जाणवू देणारी गृहलक्ष्मी इत्यादी रूपांनी स्वातंत्र्या पासून वंचित झालेली स्त्री हे तिचे विक्रार रूप बनले होते. अशा परिस्थितीत श्री चक्रधरस्वामींनी आपले तत्वज्ञान व धर्म प्रचारास सुरूवात केली. वेद प्रामाण्यात त्यांनी नकार दिला, त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या चातुवर्ण्य पद्धतीलाही त्यांनी नकार दिला. स्त्री शुद्रादिकांना मोक्ष प्राप्तीचे व धर्माचे अधिकार आहेत. तसेच उच्चनीच्चता जन्मावर अवलंबून नाही, हा विचार त्यांनी जन मानसांत खोलवर समजाविण्याचा प्रयत्न केला. स्वामींचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा अत्यंत उदार सहानु भूतीचा आणि स्त्रियांना प्रतिष्ठा देणारा असा होता. साहजिकच तोच दृष्टिकोन पंथातही दृष्टी पतीस येतो.

त्या काळानंतर स्त्रियांदेखील गुरू करीत असत. परंतु, "जयापाशी बोलो बैसा ये दाऊ मिरवू ये" असा गुरू लाभणे दुरापास्त, परंतु त्यागाच्या रुपाने असा गुरू त्यांना लाभला, महदाईसा, आवाईसा, या आणि इतर अनेक स्त्रिया या पंथाकडे वळल्यात परंतु, धर्माची द्वारे स्त्रियांसाठी खुली आहेत हा आत्मविश्वास सर्व ज्ञानीच त्यांचे ठायी निर्माण केला. स्वामींच्या शिष्य परिवारांत स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्वामींच्या काळांत सर्व सत्ता बाईसांच्या हाती होती तर गोविंद प्रभुंच्या काळांत ती सत्ता आबाईसांचे हाती होती, ती सत्ता कोणा भटोबासाकडे माहिंम भट्टाकडे नव्हती यातच स्त्री प्रतिष्ठा या धर्माने किती जाज्वल पणे जोपासली हे दिसून येते.

या पंथाने स्त्रियांना समान प्रतिष्ठा तर मिळवून दिलीच, त्याचबरोबर स्त्रियांना काही सवलतीही दिल्यात पुरुषांनी कामाचा डोंगर एकट्यानेच उपसावा. परंतु, स्त्रियांना मात्र साथ-संगत अपेक्षिली आहे. पुरुषाने थंडी वाऱ्यातही एकच वस्त्र प्रावरण करावे तर स्त्रियांनी अंगभर वस्त्र परिधान करावे. ही परवानगी स्वामींनी दिली. "पुरुषा पासी स्त्रिया स्नेहाळू वा" अशी स्वामींचीच ग्वाही आहे.

यादव कालीन समाज व्यवस्थेत स्त्री ही उपेक्षित होती. अशा विक्षिप्त अवस्थेत श्री चक्रधरांचा स्त्री शिष्यांचा परिवार मोठा होता. स्त्री भक्तांना त्यांनी कधी कमी लेखले नाही. उलट महदाबा सारख्या शिष्ये विषयी म्हटले की, "म्हातारी जिज्ञासू म्हातारी चर्चक : म्हातारी एक काही पुसतचि असे" त्यांनी स्त्रियांच्या सेवावृत्तीचा आदर केला. स्त्रीच्या ठिकाणी असणाऱ्या उपजत ज्ञानाचा त्यांनी आदर केला. ज्या काळात समाज आणि परिस्थिती यांच्या मगरमिठित स्त्री अडकलेली होती. अशा काळात श्री चक्रधरांनी नागदेवाचार्यासारख्या पंडितांच्या बरोबरीने महदाइसे सारख्या स्त्रीला उपदेश करणे ही घटना खरोखर

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

डॉ. प्रीती किशोर उमाठे
उमाठे कॉलेज, नागपूर

रू करीत असत. परंतु,
खू ये" असा गुरू लाभणे
पाने असा गुरू त्यांना
या आणि इतर अनेक
न परंतु, धर्माची द्वारे
त्मविश्वास सर्व ज्ञानीच
मींच्या शिष्य परिवारांत
स्वामींच्या काळांत सर्व
गोप्ति प्रभुंच्या काळांत
होती, तो सत्ता कोणा
हती यातच स्त्री प्रतिष्ठा
ोपासली हे दिसून येते.

ञा तर मिळवून दिलीच,
ततीही दिल्यात पुरुषांनी
सावा. परंतु, स्त्रियांना
पुरुषाने थंडी वाऱ्यातही
स्त्रियांनी अंगभर वस्त्र
वामींनी दिली. 'पुरुषा
स्वामींचीच ग्वाही आहे.

स्त्री ही उपेक्षित होती.
ज्धरांचा स्त्री शिष्यांचा
ंना त्यांनी कधी कमी
ज्या ि ो विषयी म्हटले
चर्चक : म्हातारी एक
च्या सेवावृत्तीचा आदर
उपजत ज्ञानाचा त्यांनी
आणि परिस्थिती यांच्या
ती. अशा काळात श्री
पंडितांच्या बरोबरीने
रणे ही घटना खरोखर



संपूर्ण आहे. स्त्रीलाही पुरुषा इतकीच मन, भावना आणि बुद्धी आहे, याची जाणीव मनाशी ठेवून त्यांनी स्त्रियांना धर्मोपदेश केला. त्यांनी महानुभाव संप्रदायात स्त्री पुरुष विषयक समान दृष्टी बाळगली. युग कोणतेही असो, शेवटी स्त्री आणि पुरुष या दोहोंची मिळून समाज बनला आहे. स्त्री-पुरुष ही जीवन रथाची दोन चाके आहेत. त्यातलं एकही चाक कम कुवत असता कामा नये, याचे श्रेय श्री चक्रधरांकडे जाते.

मराठी साहित्य शारदेच्या लावण्यरत्न भांडारात आपल्या साहित्य सेवेची अमोल भर घालणारा एक संप्रदाय म्हणजे महानु भाव पंथ होय. वाड्मययाच्या पहिल्या - वहिल्या खंडात स्त्रियांनी मराठी वाड.मयाची निर्मिती करावी आणि त्या निर्मितीला अक्षरत्व प्राप्त व्हावे, ही गोष्ट निश्चितच लक्षणीय मानावी लागेल. महानुभाव संप्रदायातील स्त्रियांनी आपल्या स्वयंभू प्रतिभेने आणि भक्तीच्या अत्युच्च स्पर्शाने वाड्मय वेलीला मांडवावर पोहोचवले. आणि आपली वाड्मयमूर्ती शब्दालंकारी घडविली. या सरस्वतींच्या मंदिरात मंदिरात झळाळणारी एक मूर्ती म्हणजे महाजगदंबा उर्फ महदाइसा होय.

1. **महदाइसा** - आद्य मराठी कवयित्री म्हणून जिचा विशेषत्वाने गौरव केला जातो ती महदंबा उर्फ महदाइसा ही महानुभाव पंथाने मराठी काव्याला दिलेली एक अनन्य साधारण देणगी होय. अखंड जागृतता, सतेज बुद्धिमत्ता, विलक्षण चौक सबुद्धी आणि अलौकिक प्रतिभा इत्यादि असाधारण गुणांमुळे महदाईसेला महानुभाव पंथात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ज्ञानेश्वरांच्या जीवनात मुक्ताबाईल, नामदेवांच्या जीवनात जनाबाईला तसे श्री चक्रधरांच्या जीवनात महाजगदंबेला विशेष स्थान लाभले आहे.

   शीघ्र काव्यरचना करणारी महाजगदंबा प्राचीन मराठी वाड्मयात सर्वपरिचित आहे. 'धवळे, मातृकी रूक्मिणी स्वयंवर' आणि काही स्फुट ओव्या यासारखे वाड्मय तिच्या नावावर आढळते, वाड्मय कले बरोबर, पाककला, चित्रकला, रांगोळी कला यामध्ये ती निष्णात होती. संप्रदायावर तिची आत्यंतिक निष्ठा होती. अत्यंत चिकित्सक आणि जिज्ञासू वृत्तीची महादाइसा स्वामींना नाना प्रकारचे प्रश्न विचारून ती आपली जिज्ञासा पूर्ती करीत असे.

2. **आबाइसा** - आबाइसा ही नागदेवाचार्यांची आई. आबाइसाला आणि नागदेवाचार्यांची चुलत बहिण महदाइसा या दोघींनी स्वामीं जवळ दीक्षा घेतली. प्रारंभी या दादोसा बरोबर स्वामींच्या दर्शनाला जात. आबाइसा ही कला सक्त होती. तिला चित्रकला, गायन कला अवगत होती. स्वामी जवळ पासच्या गावी असले म्हणजे त्यांच्या आबाइसा रंग मालिका रॉगोळ्या भरत असे. क्वचित ती त्यांना चौपद्या गाऊन दाखवित असे. स्वामींच्या आज्ञे वरून एक वेळ आबाइसा रिधपूरला राहून अत्यंत निष्ठेने केली. अनेक वेळा स्वामींनी त्यांना निरूपण केले. आबाइसा ही मासोपवासिनी होती. कधी कधी आबाइसाला वृद्धा बाइसा म्हणून ही म्हणत, आबाइसाला केलेले अनंत निरुपण प्रसिद्ध आहे. असा उल्लेख लीळा चरित्रात सापडतो.

3. **उमाइसा** - उमाइसा ही नागदेवाचार्यांची सख्खी बहीण. उमाइसा ही मासोपवासिनी होती. उमाइ सेलाही स्वामींनी निरूपण केलेले आहे. ते 'निरय निरुपण' या नावाने प्रसिद्ध आहे. उमाइ सेलाही गायनाचे अंग होते. एक वेळ 'बापू रे मेरी अवस्था लो' ही चौपदी तिने स्वामींना गाऊन दाखविली. मासिक धर्मामुळे विटाळ पाळण्याची काही आवश्यकता नाही. अशा आशयाचे स्वामींनी उमाइसेला उद्देशून केलेले निरूपण अत्यंत पुरोगामी विचाराचे आहे. महदाइसा ही तिची चुलत बहिण ती स्वामींनी सेवा एकनिष्ठ पणाने करीत होती. ते पाहूनच उमाइसा देखील त्यांची सेवा करू लागली.

4. **बाइसा** - एकांक काळा नंतर पूर्वार्ध काळाच्या आरंभीच

श्री चक्रधर स्वामींनी मिळालेला दुसरा शिष्य म्हणजे बाइसा होय. सुमारे सात साडेसात वर्षाचे सान्निधान बाईसाला लाभले. बाइसा ही ज्ञानही होती आणि भक्तही होती. त्यामुळे नागदेवाचार्याहूनही तिची योग्यता अधिक आहे. स्वामींच्या मठाची, पूजेची उपहाराची वगैरे सर्व व्यवस्था त्याच प्रामुख्याने पाहात. स्वभावाने ती थोडी तामसी होती. स्वमींच्या ईश्वरावतारा बद्दल कुणी शंका घेतली किंवा त्यांना इतराहून हीन लेखले तर बाईसा लागलीच संतापून त्याला शिव्या द्यायला कमी करीत नसत. पण या सगळ्याच्या मुळाशी त्यांची स्वामी वरील अनन्य श्रद्धा होती.

5. **देमाइसा -** ही मूळची पैठणची 'गुरूवाचून' गती नाही. असे पुराणात ऐकल्यामुळे गुरू करण्याची तिला तळमळ लागली होती. स्वामींची दृष्टीभेट होताच तिला स्थिती झाली आणि पुढे लौकरच हिने त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. स्वामींनी तिला अनेकदा निरूपण केले. प्रथम भेटीत विनम्रतेने का होईना पण ही स्वामींच्या समोर न बसता बाजूला बसली होती. म्हणून तिला स्वामींनी उपदेश केला. तिची स्वामींवर फार श्रद्धा होती. आपला मार्ग हा प्रगतीपर आहे. ईश्वर कशानेही मिळणार नाही 'तो जियापरी होआवा तेयाचिपरी होईल की' असे स्वामींनी सांगताच देमाइसा म्हणाली 'मग भिक्षान्न वगैरे खाऊन दुःख सोसण्यापेक्षा बापाभावाच्या घरी तुपरोटी खाऊन सुखाने का असू नये? स्वामींनी सांगितले की,' 'देमती : जोन्हळे नाही तरी काइ पेवि अमेध्यु घालु एइल : अन्न नाही तरी काइ विख खाओ एइल' असेच एक वेळ तिला स्वामींनी आपल्या गावी परत जाण्यास सांगितले. तिला राग आला. त्यावेळी तिला एक कुष्ट रोग्याची गोष्ट सांगून 'देव माझा मी देवाचा' अशा रीतीने राहण्याचे तिला निरूपण केले. त्यावेळी स्वामींनी सांगितलेले निरूपण पटले.

6. **आऊसा -** नागदेवाचार्यांच्या ही पूर्वी स्वामींना स्वतंत्र पणे अनुसरलेली आउसा ही महत्वाची व्यक्ती होय. ही पूर्वी जोगीण होती. आपणाला परीस प्राप्त व्हावा म्हणून विंझवासिनी देवीची आराधना करीत असतांना तिला दृष्टांत झाली की, 'गंगातीरी जाए मग तेथे तुज परिसु सिधैलः' त्याप्रमाणे ती गंगातीराला काऊळगाव येथे आली. जवळच्या जोगेश्वरीला स्वामी होते. तिथे तिला स्वामींनी सन्यास दिला. पहिल्याच भेटीत श्री चक्रधरांवर श्रद्धा बसून अनुसरलेल्या स्त्रीचे म्हणून हे उदहारण अपूर्व होय. ती अत्यंत निर्विकार होती.

आज देशांत सर्वत्र स्त्री मुक्तीचे वारे वहात आहेत. 33 टक्के आरक्षण स्त्रियांना देऊन कांही फार मोठी मेहेरबानी सरकारने स्त्रियांवर केली आहे. ठिकठिकाणी महिला दिन साजरे होत आहेत. 21 व्या शतकाकडे घोडदौड करतांना परंतु, स्वामींनी 11 व्या शतकांतच स्त्रियांना मुक्तिचे दालन खुले करून देण्यासाठी स्त्रीबंधनांवर आपल्या तत्वज्ञानाने, आदर्शाने घणाघाती प्रहार केला आणि स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा मिळवुन दिली. स्त्री चे क्षेत्र रांधा, वाढा आणि उष्टी काढा या पुरतेच मर्यादित न रहाता ती जेव्हा सर्वांची माता बनेल ती लोकमाता बनेल तेंव्हाच समाजाचा पर्यायाने देशाचा उद्धार होईल हाच विचार सर्वज्ञांना अभिप्रेत होता आणि याच विचारांचा प्रचार आज हा धर्म मोठ्या अभिमानाने जनमानसांत करीत आहे.

***संदर्भ ग्रंथ :***


1) *'लीळा चरित्र' डॉ. पुरूषोत्तम नागपुरे*
2) *महानुभाव पंथ व त्यांचे वाडमय - शं. गो. तुळपुळे व्हिनस प्रकाशन, पुणे*
3) *लीळा चरित्रातील समाजदर्शन - सुमन बेलवलकर, पाप्युलर प्रकाशन मुंबई.*
4) *महानुभावांचा इतिहास - मुरलीधर कोळपकर*
5) *महानुभाव दर्शन - अन्नासाहेब अडसोड*